सकाळ अग्रोवन
सोमवार, २० ऑक्टोबर २०२५

# हरभरा वाणांची गुणवैशिष्ट्ये

डॉ. सुरेश दोडके, डॉ. अरविंद तोत्रे,
डॉ. अमोल लांघी

**हरभरा पिकाची लागवड करताना नवीन विकसित वाणाचा वापर केल्यास उत्पादनात वाढ मिळविणे शक्य होते. हरभरा पिकाचे विविध वाण विद्यापीठांद्वारे प्रसारित करण्यात आले आहेत. त्यांची वैशिष्ट्ये जाणून योग्य वाणाची लागवडीसाठी निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.**



हरभरा लागवडीसाठी योग्य वाणाची निवड करावी.

हरभरा हे रब्बी हंगामात घेतले जाणारे प्रमुख कडधान्य पीक आहे. हरभरा पीक आंतरपीक व फेरपालटीसाठी उत्कृष्ट आहे, यामुळे जमिनीचा पोत टिकून राहण्यास मदत होते. राज्यात प्रामुख्याने सोयाबीन काढणीनंतर हरभरा पिकाची लागवड केली जाते. हरभरा हे पीक जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर घेतले जाते. देशात हरभरा उत्पादनात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, कर्नाटक, झारखंड, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ व तेलंगणा ही राज्ये अग्रेसर आहेत.

हरभरा पिकाची लागवड करताना नवीन विकसित वाणाचा वापर केल्यास उत्पादनात निश्चितपणे वाढ मिळविणे शक्य होते. हरभरा पिकात देशी व काबुली असे दोन प्रकार आहेत. काबुली हरभऱ्याच्या तुलनेत देशी हरभऱ्यात पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता अधिक असते. कमी पाण्यावर देखील अधिक उत्पादन मिळते. काबुली वाणाची पेरणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा आवश्यक असतो. महाराष्ट्रमध्ये प्रामुख्याने देशी हरभरा लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. हरभरा पिकाचे विद्यापिठांद्वारे विविध वाण प्रसारित करण्यात आले आहेत. त्यांची वैशिष्ट्ये जाणून योग्य वाणाची लागवडीसाठी निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

## देशी वाण

### विजय

- **कालावधी :** जिरायती ८५ ते ९० दिवस, बागायती १०५ ते ११० दिवस.
- **वैशिष्ट्ये :** हा वाण बुटका, पसरट असून पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता, मर रोगास प्रतिकारक्षम, जिरायत, बागायत आणि उशिरा पेरणीस योग्य.

**सरासरी उत्पादन (हेक्टरी) :**

- जिरायती : सरासरी १४ क्विंटल, तर जास्तीत जास्त १४ ते १५ क्विंटल.
- बागायत : सरासरी २३ क्विंटल, जास्तीत जास्त ३५ ते ४० क्विंटल
- उशिरा पेरणी : सरासरी १६ क्विंटल, जास्तीत जास्त १६ ते १८ क्विंटल.

### दिग्विजय

- **कालावधी :** जिरायती ९० ते ९५ दिवस, बागायती ११० ते ११५ दिवस
- **वैशिष्ट्ये :** पिवळसर तांबूस टपोरे दाणे, मर रोगास प्रतिकारक्षम, जिरायती, बागायती तसेच उशिरा पेरणीस योग्य.

**उत्पादन (हेक्टरी)**

- जिरायती : सरासरी १४ क्विंटल, जास्तीत जास्त १४ ते १५ क्विंटल
- बागायती : सरासरी २३ क्विंटल, जास्तीत जास्त ३५ ते ४० क्विंटल
- उशिरा पेरणी : सरासरी २१ क्विंटल, जास्तीत जास्त २० ते २२ क्विंटल

### विशाल

- कालावधी : बागायती ११० ते ११५ दिवस
- वैशिष्ट्ये : आकर्षक पिवळे टपोरे दाणे, मर रोगास प्रतिकारक्षम, घाटे आकाराने मोठे असून गर्द हिरवे असतात.

**उत्पादन (हेक्टरी)**

- जिरायती : सरासरी १३ क्विंटल, जास्तीत जास्त १४ ते १५ क्विंटल

बागायती : सरासरी २० क्विंटल, जास्तीत जास्त ३० ते ३५ क्विंटल.

### फुले विक्रांत

- कालावधी : १०५ ते ११० दिवस

**वैशिष्ट्ये**

- पिवळसर तांबूस मध्यम आकाराचे दाणे, बागायती पेरणीस योग्य, मर रोगास प्रतिकारक्षम.
- उत्पादन (हेक्टरी) : या वाणाची उत्पादन क्षमता हेक्टरी ४१.६६ क्विंटल इतके असून, सरासरी उत्पादन २० क्विंटल इतके आहे.

### फुले विक्रम

- कालावधी : १०५ ते ११० दिवस

**वैशिष्ट्ये**

- घाटे जमिनीपासून १ फुटाच्या वर लागतात.
- वाढीचा कल उंच असल्यामुळे यांत्रिक पद्धतीने काढणी करण्यास उपयुक्त वाण.
- १०० दाण्याचे वजन २१.६ ग्रॅम.
- मर रोगास प्रतिकारक्षम.
- अधिक उत्पादनक्षमता.

**उत्पादन (हेक्टरी)**

- सरासरी उत्पादन : १६ क्विंटल, जास्तीत जास्त १६ ते १८ क्विंटल.
- बागायती : २२ क्विंटल, जास्तीत जास्त ४० ते ४२ क्विंटल.
- उशिरा पेरणी : २१ क्विंटल, जास्तीत जास्त २२ ते २४ क्विंटल.

### फुले विश्वराज

- पक्वता कालावधी : ९५ ते १०५ दिवस

**वैशिष्ट्ये**

- पिवळसर तांबूस रंगाचा, मध्यम दाणे
- जिरायती पेरणीस योग्य
- वाढीचा कल निम उंपट, उंचीला बुटका
- घाटे मध्यम आकाराचे
- मर रोग प्रतिकारक्षम
- पश्चिम महाराष्ट्राकरीता प्रसारित.
- सरासरी उत्पादन (हेक्टरी) : जिरायती : १५ क्विंटल, जास्तीत जास्त २८ ते २९ क्विंटल.

### जाकी-९२१८

- विदर्भ विभागासाठी प्रसारित

**वैशिष्ट्ये**

- मध्यम आकाराचे दाणे
- १०० दाण्यांचे वजन २२ ते २६ ग्रॅम
- मर रोग प्रतिकारक्षम
- सरासरी उत्पादन (हेक्टरी) : जिरायती १५ ते १६ क्विंटल, बागायती २६ ते २८ क्विंटल.

### पीडीकेव्ही कांचन

- पक्वता कालावधी : १०५ ते ११० दिवस

**वैशिष्ट्ये**

- मध्यम टपोरे दाणे
- १०० दाण्याचे वजन १९.७ ग्रॅम
- विदर्भ विभागासाठी प्रसारित
- मर रोग प्रतिकारक्षम
- सरासरी उत्पादन (हेक्टरी) : बागायती १८ ते २० क्विंटल, जास्तीत जास्त ३५ ते ४२ क्विंटल.

### पीडीकेव्ही कनक

- पक्वता कालावधी : १०८ ते ११० दिवस

**वैशिष्ट्ये**

- यांत्रिक पद्धतीने काढणीकरता योग्य
- संरक्षित ओलीताखाली लागवडीसाठी शिफारस
- महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातसाठी प्रसारित
- सरासरी उत्पादन : हेक्टरी १८ ते २० क्विंटल.

### बीडीएनजी-७९७ (आकाश)

- पक्वता कालावधी : १०५ ते ११० दिवस

**वैशिष्ट्ये**

- मराठवाडा विभागासाठी प्रसारित
- मर रोग प्रतिकारक्षम
- मध्यम आकाराचे दाणे
- अवर्षण प्रतिकारक्षम
- सरासरी उत्पादन (हेक्टरी) :
- जिरायती १४ ते १५ क्विंटल, बागायती २० ते २२ क्विंटल.

### परभणी चना-१६

- पक्वता कालावधी : ११० ते ११५ दिवस

**वैशिष्ट्ये**

- मराठवाडा विभागासाठी प्रसारित
- यांत्रिकीकरणासाठी सुलभ
- टपोरे दाणे
- मर रोगास प्रतिकारक्षम
- सरासरी उत्पादन : हेक्टरी २७ ते २८ क्विंटल.

- डॉ. सुरेश दोडके, (प्रमुख शास्त्रज्ञ)
९६०४२६११०१,
- डॉ. अरविंद तोत्रे, (वरिष्ठ संशोधन सहयोगी)
९४२०९५४८४४
(कडधान्य सुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. नगर)